
# शिवाजी पार्क ते सेंट्रल पार्क - आत्मकथन




नमस्कार,

आठवणी हे माणसाला लाभलेलं एक वरदान आहे. हे लक्ष्यात घेऊन माझी स्मरणशक्ती शाबूत आहे तोंवर व माझ्या वयाची पंचाहत्तरी ओलांडली की, *'शिवाजी पार्क ते सेंट्रल पार्क'* हा प्रदीर्घ जीवन प्रवास लिहायला घ्यायचा आणि थोड्या अवधीतच येणाऱ्या आमच्या लग्नाच्या पन्नाशीला तो पूर्ण करायचा. असं मी ठरवलं होतं. (अर्थात, त्याची तयारी आधीपासून केली होती.) त्याला इतर कारणेंही होती. त्यातील एक म्हणजे, माझ्या वयाचा 'अमृत महोत्सव' व आमच्या लग्नाचा 'सुवर्ण महोत्सव' हे दोन अद्वितीय योग जुळणार होते. हा दुग्धशर्कराचा दैवी शुभयोग होता. शिवाय, महत्त्वाचं असं की, *"Say it before you run out of time. Say it before it's too late. Say what you're feeling. Waiting is a mistake. So, do it now before it's too late..."* ही वेळ साधून आठवणींनी गुंफलेली स्मरणयात्रा लिहायचा विचार निश्चित केला.

तत्पूर्वी मुंबई महापालिकेचा निर्णय माझ्या वाचनात आला. तो असा होता: जिथे माझा जन्म झाला त्या *"ऐतिहासिक शिवाजी पार्कचा चेहरा-मोहरा बदलणार; न्यूयॉर्कमधील सेंट्रल पार्कच्या धर्तीवर होणार त्याचा विकास." आणि "दादरमधील शिवाजी पार्कचं नांव बदलून त्याचं नांव 'छत्रपती शिवाजी महाराज पार्क' असं बदलण्यात आलं."* त्यानंतर हेही वाचनात आलं: *"तिकडे न्यू यॉर्कमध्ये शिवाजी पार्कच्या आकाराची २८ ते ३० मैदानं बसतील एवढं मोठं सेंट्रल पार्क आहे. ते आजवरच्या कोणत्याही सरकारनं सांभाळलेलं नाही. तर तिथल्या जनतेनं ते सांभाळलं आहे, जपलं आहे. तुम्ही साधं एक मैदान जपूं शकत नाही. कृपया शिवतीर्थाची स्मशानभूमी करूं नका..."* या सर्व हाल-चाली वाचतांना वाईट वाटलं व मन दुखावलं. आणि *'शिवाजी पार्क ते सेंट्रल पार्क'* हे 'आत्मकथन' लिहिण्यास माझी लेखणी सरसावली...





*शिवाजी पार्क व सेंट्रल पार्कचे विहंगम दृश्य...*

- मुंबईतील सर्वात सुंदर व दादरचे भूषण असलेली सुनियोजित वसाहत म्हणजे, शिवाजी पार्क. ज्याचे शिल्पकार इंजिनियर नानासाहेब मोडक होते. राजकीय, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील शिवाजी पार्क हे प्रथम माहीम पार्क ओळखलं जात होतं. १९२७ रोजी मुंबई महापालिकेने त्याचं नांव जाहीरपणे बदलून 'शिवाजी पार्क' ठेवलं होतं. पुढे आचार्य अत्रे यांनी त्याचे नांव 'शिवतीर्थ' ठेवलं होतं. एक मैलाचा परीघ असलेलं ऐतिहासिक शिवाजी पार्क हे एकमेव गोलाकार मैदान असेल ज्याला सर्व बाजूंनी बसायला बाहेरून संपूर्ण कट्टा आहे. आणि आंतून चालायला पाऊलवाट आहे. शिवाय, आंत बसायला सोयिस्कर सर्वत्र बांकडे आहेत. मात्र, आजची परिस्थिती वेगळी आहे. मुंबईत गेल्यावर शिवाजी पार्कच्या कट्ट्यावर संध्याकाळी बसायला गेलो तर जागा नसते. इतकी गर्दी असते. तेव्हा आजी-आजोबा उद्यानात जावं लागतं. तेथे 'जयु' म्हणून हांक मारणारी कांही मित्रमंडळी अजूनही मला प्रेमाने व आपुलकीने भेटतात. चौकशी करून चहा पाजतात व भरपूर गप्पा मारतात. तसेच, यापूर्वी दुर्मिळ आठवणींनी लिहिलेला व गाजलेला

माझा *'शिवाजी पार्कच्या कट्ट्यावरून'* या स्मरणरंजनात्मक व पारितोषिक विजेत्या सचित्र लेखाची न चुकतां सर्वजण आजही कौतुकाने आठवण काढतात. ही माझी पुण्याई आहे...







*१) शिवाजी पार्कमधील आजी-आजोबा उद्यान... २) तेथे हमखास भेटणारे माझे बालमित्र... ३) थंडीत Snowने पांघरलेलं न्यू यॉर्कचे निसर्गरम्य सेंट्रल पार्क... ४) तेथे बसायला असलेले बांकडे...*

- न्यू यॉर्क मधील मानवनिर्मित जागतिक कीर्तीचं निसर्गरम्य सेंट्रल पार्क म्हेणजे एक आश्चर्यच आहे. या पार्कचे झाडी-झुडुपे, तलाव आणि हिरवळींनी भरलेले आकर्षक रूप पाहतांना ते मूळच्या खडकाळ, ओसाड जागेवर वसवलेलं आहे, आणि त्यातले सर्व तलाव हे मानवनिर्मित आहेत, याची कल्पना येत नाही. तसेच, येथे पायवाटांची असंख्य जाळी, दोन आईस स्केटिंग रिंक्स (यातल्या एकीचा जुलै व ऑगस्टमध्ये पोहण्याचा तलाव बनतो), प्राणिसंग्रहालय, फुलझाडांनी भरलेली बाग, अभयारण्य, उघडे प्रेक्षागृह, शेक्सपियरची नाटके सादर करणारे देलाकोर्ट उघडे थिएटर, बेलवेडर किल्ला, स्विडीश कॉटेज मॅरिओनेट थिएटर, ऐतिहासिक चक्री, इत्यादी अनेक आकर्षणांनी भरलेली आहेत. जागतिक पर्यटकांचं आकर्षण असलेलं बेथेस्डा कारंजे आणि त्याचा परिसर या पार्कमधील एक प्रेक्षणीय व महत्त्वाचे ठिकाण आहे. आणि चालायची इच्छा नसल्यास या पार्कची सफर तेथे भाड्याने मिळणाऱ्या सायकलीने किंवा घोड्याच्या बग्गीतून करता येते... थोडक्यात, हे सर्व लक्ष्यात घेतां आठवणी विस्मरणात जाण्यापूर्वी या हजारों मैलाच्या प्रवासाचं अंतर आपण शून्यावर आणायचं असं मी ठरवलं. ही यामागची प्रामाणिक भूमिका. असो.

---

- **बचपन के दिन भुला ना देना,** आज हँसे कल रुला न देना...
*'देव तारी त्याला कोण मारी'* किंवा परमेश्वराच्या मनात वेगळं होतं. असं जेव्हा आमच्या घरात घडलं त्या दिवशी म्हणजे, २६ नोव्हेंबर, १९४७ साली कर्मधर्म संयोगाने अस्मादिक इंद्रसुत 'जयंत' जन्माला आले होते. आणि आमच्या कुळकर्णी घराण्यात गोंधळ उडाला होता. त्याचं काय झालं, आमच्या घरात उशीरा जन्मलेल्या थोरल्या बहिणी नंतर तीन वर्षाच्या अंतरानी माझे दोन मोठे

भाऊ जन्माला आले होते. साहाजिक पुढे एखादी मुलगी असावी म्हणून आई-वडिलांनी (उशीराने) विचार केला होता. मात्र, अपेक्षा फक्त मुलीचीच केली होती. मुलाची नाही. एव्हडंच काय, मुलीचे नांव 'शरयू' ठेवायचे हा निर्णयही पक्का झाला होता. परंतु, विधिलिखित वेगळं होतं. थोरल्या बहिणी नंतर तब्बल बारा वर्षानी दादरच्या गोखले रोड वरील मोघे भुवन समोरील टिळक



*१-२) माझे तीर्थरूप आई वडील: प्रा. विठ्ठल हरी व इंदिरा कुळकर्णी... ३) अस्मादिक 'जयंत'... ४) मी व वीणा... ५) गोंडस सलील व आम्ही...*

कैकिणीच्या हॉस्पिटलमध्ये 'शरयू' जन्माला न येतां, मी जन्माला आलो होतो. त्यामुळे घरातील मंडळींनी मुलाचा विचारच केला नसल्याने मुलाचं नांव काय ठेवायचं हा प्रश्न निर्माण झाला होता. अखेर वडिलांनी 'जयंत' हे नांव सुचविले. योगायोगाने त्यावेळी नागपूरला आमच्या मावशीला मुलगी झाली होती. आणि तिचे नांव 'शरयू' ठेवण्यात आले होते. कुळकर्ण्यांच्या घरात या विचित्र योगायोगावर समा-धान मानावे लागले होते. त्यात कौतुकाची बाब म्हणजे, आमच्या कशेळी गांवात आजी-आजोबांनी लक्ष्मी नारायण व कनकादित्य या आमच्या दैवतांना नैवेद्य दाखवून आनंद व्यक्त केला होता. अर्थात, हे सर्व मला कालांतराने मोठा झाल्यावर कळलं होतं. साहजिक घरातील शेंडेफळ म्हणून पुढे माझं खुप कौतुक झालं हा भाग वेगळा...

**- कुछ याद रहे तो सुन कर जा,** तू हाँ कर जा, या ना कर जा...

कोण म्हणतं *'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात'*... गोऱ्या रंगाचा, गुटगुटीत, गोजिरवाणा, तपकिरी डोळ्यांचा, कुरळ्या केसांचा व सर्वांचा लाडका ‘जयंता' पुढे कोण होणार हे तर्क त्यावेळी करणं शहाणपणाचं नव्हतं. परंतु, नामवंत प्राध्यापक व साहित्यिकाच्या घराण्यात पुढे जयंता निश्चित बहुशिक्षित होईल अशी इच्छा घरातल्या मंडळींनी (नाईलाजाने) केली होती. नशिबाने आमच्या कुळकर्णी घराण्यात शैक्षणिक, साहित्यिक व सामाजिक अशा अनुकूल वातावरणासोबत संगीता-चीही आवड होती. जवळच रहाणाऱ्या आमच्या थोरल्या काकांकडे ग्रामोफोन व दुर्मिळ रेकॉर्डसचा

प्रचंड संग्रह होता. मला आठवतंय संध्याकाळचे जेवण झाल्यावर महिन्यातून एकदा घरातील सर्व मंडळी त्यांच्याकडे गप्पा मारायला आणि गाणी ऐकायला जात असत. त्यावेळी माझे मोठे भाऊ मला (तक्रारीसह) कांदे-बटाटे करून घेऊन जात असत. तेव्हा बाल गंधर्व, प्यारासाहेब, सैगल, काननबाला/काननदेवी वगैरेंची गाणी झोपेत असतांना सतत माझ्या कानावर पडल्याचं ऐकिवात आहे. कळत-न-कळत गाण्यांची समज आल्यावर पुढे परिणाम असा झाला की, मला ‘तानसेन’ न होतां ‘कानसेन’ व्हायला मला वेळ लागला नाही. मात्र, प्रभावित झालो ते गोड गळ्याच्या कानन देवीच्या श्रवणीय गाण्यांनी. विशेषतः १९४२च्या 'जवाब’ मधील *'कुछ याद रहे तो सुन कर जा’* व *'तूफान मेल’* या गाण्यांनी. आणि सुदैवाने माझ्या सुरील्या जीवनाच्या सुवर्ण स्वप्ननगरीत उजा-डलेली ती 'स्वरपहाट’ होती. योगायोगाने याचवेळी पुण्यातील एक सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते व दिग्दर्शक त्यांच्या चित्रपटात लहान मुलाच्या भूमिकेसाठी मला संधी देण्यासाठी आमच्या घरी आले होते. दुर्दैवाने त्यांच्या कथानकाचा शेवट अपघाताचा होता, त्यात तो मुलगा निधन पावतो. त्याचा शेवट तसा न करतां गोड करावा ही आई-वडिलांची विनंती त्यांनी मान्य केली नव्हती. म्हणून आलेली सुवर्ण संधी नाकारली गेली होती. आई-वडिलांचा हा निर्णय योग्य होता... अपघाताने अथवा योगायोगाने म्हणा, माझ्या छांदिष्ट स्वभावामुळे पुढे सिनेसृष्टीतील स्मरण-रंजनाच्या दुनियेत तत्सम कलाकारांची माझी कायमची दोस्ती होणार होती. हा जणू तो संकेत होता. एकंदरीत, माझ्या जन्मापासूनच एखाद्या चित्रपटासारखं कथानक असलेल्या सत्यकथेला सुरूवात झाली होती...




*१-२) माझ्या शालेय शिक्षणाचा 'श्री गणेशा' जिथे झाला ती, आदरणीय दादा रेगे यांची 'बालमोहन विद्यामंदिर' शाळा. मला आठवतंय पूर्वी तेथे पिंपळाचं भलं मोठं झाड होतं. रात्री तेथून जातांना पिंपळाच्या पानांची ती सळसळ आजही कानात गुंजारव करतात... ३) निसर्गरम्य वातावरणातील आशिया खंडातील सर्वोत्तम व भूषणावह आर्ट स्कुल, सर जे. जे. स्कुल ऑफ आर्ट. जेथे मी जाहिरात क्षेत्रातील पदवी घेतली होती...*

**- मैं राही भटकने वाला हूँ** कोई क्या जाने मतवाला हूँ...
दादरचं भूषण असलेल्या शिवाजी पार्कच्या डॉ. राऊत रोड वरील वैभवी मधल्या गल्लीत सुप्रसिद्ध, सुशिक्षित व नामवंत कुळकर्णी घराण्यात माझा जन्म झाला होता. आणि शिक्षणाचा 'श्री गणेशा' आमच्या घरासमोरच असलेल्या शिक्षण महर्षी दादा रेगे यांच्या 'बालमोहन विद्यामंदिर' शाळेत झाला होता. मात्र, चित्रकलेची आवड असल्यामुळे माझं पुढील शिक्षण आशिया खंडातील सर्वोत्तम 'सर जे. जे. स्कुल ऑफ आर्ट' कॉलेज मधून झाले होते. तेथून जाहिरात क्षेत्रातील ग्राफिक डिझायनरची पदवी घेतली होती. तो अनुभव घेतांना व्यवसायिक दृष्टीसह कल्पना शक्ती विशाल झाली व सप्तरंगी विश्वात वावरतांना निसर्गाशी जवळीक झाली. हा भक्कम अनुभव पाठीशी असल्याने मला कट्टर-इस्लामिक-धार्मिक आखाती देशात म्हणजे 'दोहा, कतार' या गांवात एका प्रसिद्ध ब्रिटिश-अरब जाहिरात कंपनीत ग्राफिक डिझायनर-आर्ट डायरेक्टर म्हणून काम करण्याची संधी चालून आली. त्यावेळी माझं लग्न झालं होतं. मुलगा सलील फक्त दीड वर्षाचा होता. वीणा, सलील व वृद्ध वडिलांना मागे ठेऊन तेथे जाण्याचं मी धाडस केलं होत. अलिबाबाच्या त्या गुहेत जाऊनही केवळ Homesick झाल्याने मी वर्षभरच तेथे राहिलो होतो. तो काळ १९७५चा होता. मात्र, त्यावेळी दोहा, कतार हे अत्यंत मागासलेलं गांव होतं.






*१) १९७५ साली मी कट्टर-धार्मिक 'कतार'ला असतानाचं 'दोहा'... २) तेच सध्या जागतिक कीर्तीचं 'नंदन-वन' म्हणून ओळखलं जाणारं 'कतार' मधील 'दोहा' शहर...*

शहर म्हणण्याचं मी धाडस करणार नाही. परंतु, माझी सिनेसंगीताची आवड माझ्या सोबत होती. पत्र लिखाणासोबत तोच काय एक आधार होता. सुदैवाने त्या रुक्ष वाळवंटात मला हिंदी गाण्यांचे कांही संगीत शौकीन भेटले होते. पाकिस्तानी अधिक होते. योगायोगाने तेथे नवोदित पाकिस्तानी गझल गायक गुलाम अलीसह मल्लिका-ए-तरन्नुम नूरजहाँ यांचे खाजगी गाण्याचे कार्यक्रम ऐकायला मिळाले होते. हे माझं भाग्य होत. आणि त्यामुळे मी 'प्यासा' राहिलो नव्हतो. पैशाव्यतिरिक्त हाच काय तो एकमेव मनोरंजनाचा व सुखाचा भाग होता. एकदा टॅक्सीतून जातांना पाकिस्तानी ड्रॉयव्हरने दिलोंकी धडकन मधुबालाच्या 'बादल' सिनेमातील गाणी लावली

होती. आणि मी त्याला साथ देऊन त्याची स्तुती केली होती. मला सर्व कलाकारांसह ती गाणी माहिती होती म्हणून तोही खुष झाला होता. त्यातील '*दुनिया बदल रही है आँसू बहाने वाले*' हे लताचं गाणं ऐकतांना मी त्याला म्हटलं, हे गाणं प्यारी 'पूर्णिमा' नटीवर चित्रित केलं आहे. तेव्हा त्या टॅक्सी ड्रायव्हरने मागे वळून म्हटलं, *"भाईसाब, क्या बात है, आपने मेरे दिलकी बात छेडी..."* त्या आनंदात त्याने प्रवासाचे पैसे घेतले नव्हते. हा संगीताचा परिणाम होता. त्यावेळी त्या सिनेमातील मुकेशचं गाणं मनात गुणगुणलो, *"मैं राही भटकने वाला हूँ, कोई क्या जाने मतवाला हूँ..."* जणूं त्या मृगजळी वाळवंटात मला फुलाचा सुगंध मिळाल्याचा आनंद झाला होता. मात्र, घरच्या ओढीने मी वर्षांने मुंबईला परतलो होतो...
मंडळी, आज त्या संपूर्ण Arabian Peninsula मध्ये त्यावेळी मागासलेलं ते छोटेखानी 'कतार' हे गांव आज जागतिक कीर्तीचं 'नंदनवन' म्हणून ओळखलं जातंय. पुढे ते पुनः पाहाण्याचं भाग्य आम्ही अनुभवलं होतं...

**- सपनों की सुहानी दुनिया को** आँखों में बसाना मुश्किल है...
तसं पाहिलं तर माझी व वीणाची प्रस्तावपूर्व लग्नगांठ आमच्या वयाच्या फार लवकर बांधली गेली होती. आनंदाची बाब अशी, आईच्या जबरदस्त इच्छेप्रमाणे झालेल्या माझ्या लग्नामुळे आमच्या कुळकर्णी घराण्यात एकमेव (सुग्रण व सुस्वरूप) 'कऱ्हाडे ब्राह्मण' सून म्हणून




*१-२-३) सुप्रसिद्ध छयाचित्रकार व माझा मित्र कै. उदय मिठबावकर यानी काढलेले वीणाचे फोटो...*
*४-५) १९७६ साली Star & Style च्या Mirror या नवं-वर्षाच्या मासिकाच्या मुखपृष्ठासाठी नामवंत फोटोग्राफर बी. के. सनील यानी काढलेले वीणाचे फोटो...*

अगदी लहान वयात वीणाचा प्रवेश झाला होता. त्यावेळी मी २४ व वीणा १९ वर्षाची होती. मला आठवतंय लग्न समारंभाला आलेले कवी विंदा करंदीकर हातामधली भाजीची पिशवी उंचावून

सर्वांसमोर विनोदाने मला म्हणाले होते, *"जयंता, आज काय या भातुकलीच्या लग्नाची मजा करून घे. उद्यापासून तुला बाजारहाट करावी लागणार आहे...!"* वडीलधाऱ्या सुना परदेशात असल्याने व बालपण नसलेल्या वीणाच्या अंगावर (बारा वर्षाची असतांना वडील गेल्याने) लग्नानंतर लहान वयातच संसाराच्या प्रचंड जबाबदाऱ्या पडल्या होत्या. त्यात, दुर्दैवाने लग्नानंतर सहा महिन्यातच धक्कादायक घटना घडली होती. आमच्या आईचं अपघाताने निधन झालं होतं. आमच्या आईची तब्बेत बरी नसे. त्यामुळे तिच्या सेवेसाठी २४/७ आचारी व गडी माणसं होती. साहजिकच आई गेल्या नंतर त्यांची जरुरी नसल्याने त्यांना काढ-ल्यावर सर्व भार वीणावर पडला होता. त्यातून आमच्या घरी वडि-लांच्या शैक्षणिक, व्यवसायिक व सामाजिक कार्यामुळे येणाऱ्यां जाणाऱ्यांची वर्दळ व साहित्यि-कांचा सदैव राबता असे. त्यामुळे चहा-पाण्यासह होणारी त्यांची उठबस दिवसभर वीणाला करावी लागत असे. बिचाऱ्या वीणाला हे सर्व नव्याने होतं. मात्र, वीणाने सर्व अडी-अडचणींना आनंदाने तोंड देऊन सुखाने संसार केला होता. त्यात दुर्दैव असं होतं की, तत्पूर्वी जो घरात सोयीचा बॉबे गॅस होता तो नेमका त्यावेळीच कायमचा बंद झाला होता. अशा कठीण परिस्थितीत बरशेनच्या शेगड्याही लवकर मिळत नव्हत्या. त्यामुळे तिला रॉकेलच्या रांगेत उभे राहून फरफऱ्या व वातीचा स्टोव्हवर स्वयंपाक करावा लागत असे. आणि या कष्टमय जीवनातून एकमेव सुखाचा मार्ग होता. तो म्हणजे, सुखी संसार करायला धाडस करून आम्ही वडिलांसह अमेरिकेच्या स्वप्न नगरीत जाणं... त्याप्रमाणे, शिक्षणासाठी न जातां केवळ नोकरीसाठी *'चले पवन की चाल, जग में चले पवन की चाल'* म्हणत मी न्यू यॉर्कच्या स्वप्न-नगरीत एकट्याने आधी आलो. पुढे नोकरी मिळाल्या नंतर वीणा, पांच वर्षाचा सलील व ८० वर्षांचे वडील आले होते. तो काळ होता १९८२ चा. महत्वाचं म्हणजे, या धांवपळीत कर्तव्यदक्ष वीणा मागे राहिलेला माझा आवडीचा अफाट दुर्मिळ गाण्यांचा संगीत संग्रह व तत्सम स्मरणरंजनाचं प्रचंड गाठोडं काळजीपूर्वक सोबत घेऊन यायला विसरली नव्हती...

- ये रात ये चाँदनी फिर कहाँ, **सुन जा दिल की दास्ताँ...**

मी झोपण्यापूर्वी माझे वडील माझ्या आवडीचं *'ये रात ये चाँदनी फिर कहाँ, सुन जा दिल की दास्ताँ...'* हे गाणं अंगाई गीत म्हणून म्हणत असत. आश्चर्य म्हणजे, मला लगेच झोप लागत असे. शिवाजी पार्कला असतांना कानन देवीच्या गाण्यांनी जी 'स्वरपहाट' उजाडली होती. त्या 'तूफान मेल' मधून प्रवास करतांना माझ्या छांदिष्ट स्वभावाला अनेक पैलू लाभले होते. माझ्याकडील दुर्मिळ गाण्यांच्या व इतर संग्रहामुळे सिने व इतर क्षेत्रातील नामवंत कलाकारांची प्रत्यक्ष ओळख व परिचय होता गेला होता. त्यामुळे त्यांचं आमच्या घरी नियमित येणं-जाणं होत गेलं. तसेच, कलाकारांच्या ओळखीने व संग्राहक मित्रांमुळे माझ्या संग्राहात अधिकाधिक भर

पडत गेली. ते 'दुर्मिळ धन' इतरांना देण्यात माझा आनंद द्विगुणित होत गेला. आणि आजही होत आहे. या छंदाबरोबर मला क्रिकेट खेळाबद्दलही रस होता. त्यातून माझा जन्म जेथे झाला त्या ऐतिहासिक शिवाजी पार्क परिसरात राजकारणी, समाजसेवक व्यक्ती, शिक्षण संस्था, सुप्रसिद्ध साहित्यिक, सिने व विविध क्षेत्रातील नामवंत कलाकारांसोबत जागतिक कीर्तीचे क्रिकेट खेळाडू जन्माला आले होते. ज्यावेळी क्रिकेट हा खेळ Gentleman's Sport समजला जात असे त्यावेळी शाळा कॉलेज पासून मुंबई-तील सर्व मैदानातून, क्लबमधून व ब्रेबॉर्न स्टेडियमवर सुद्धा मी क्रिकेटच्या मॅचेस खेळलो होतो.  आणि शतकं झळकावली होती. तसेच, पतंग उडविण्यातही मी तरबेज होतो. इतकंच काय, जागतिक कीर्तीचा ब्लास्टर मास्टर सचिन तेंडुलकरचा जन्म झाला नव्हता त्याआधी मी सचिनचा क्रिकेट-मधील गुरु रमाकांत आचरेकरबरोबर त्याच्या क्लबमधून पांच वर्ष एकत्र A Divisional Kanga League Cicket Matches खेळलो होतो. संगीत शौकीन रमाकांत आचरेकर हा माझा चांगला मित्र होता होता. त्यामुळे तो जुनी हिंदी गाणी ऐकायला आमच्या घरी येत असे. दुर्दैवाने हल्लीच्या काळात क्रिकेट हा खेळ 'विटी दांडू' प्रमाणे खेळला जातो, या मताचा मी आहे. मात्र, अभिमानाची बाब अशी की, ज्या शिवाजी पार्क जिमखान्याने भारताला जागतिक कीर्तीचे क्रिकेट मधील भूषणावह, दर्जेदार व अष्टपैलू खेळाडू दिले, त्या शिवाजी पार्क जिमखान्याचा चित्रकार या नात्याने १९७० साली 'मोनोग्राम'-'सिम्बॉल'चं डिझाईन मी तयार केलं होतं. याचा मला अभिमान आहे...




SPG
SHIVAJI PARK GYMKHANA



*१) क्रिकेट क्षेत्रात जागतिक कीर्ती मिळविणाऱ्या शिवाजी पार्क जिमखान्याच्या खेळाडूंची 'स्टार गॅलॅक्सि'-'हॉल ऑफ फेम' प्रदर्शनी दीवार...  २) जेथे मीही क्रिकेट खेळलो होतो, त्या शिवाजी पार्क जिमखान्याचा १९७० साली चित्रकार या नात्याने मी डिझाईन केलेला मोनोग्राम... ३) ब्लास्टर मास्टर सचिन तेंडुलकरचा सचिन तेंडुलकरचा क्रिकेट कोच व आमचा कौटुंबिक स्नेही द्रोणाचार्य रमाकांत आचरेकर बरोबर त्याच्या घरी मी व वीणा...*

वर सांगितल्या प्रमाणे आमचं घर हे साहित्य, शैक्षणिक व सामाजिक परंपरेतील होतं. माझे सुप्रसिद्ध व नामवंत वडील हे माटुंग्याच्या रामनारायण रुईया कॉलेजमध्ये इंगजीचे प्राध्यापक व

त्या विभागाचे प्रमुख होते. इंग्रजीसह संस्कृत विषयातील प्रभुत्व वाखाणण्यासारखं होतं. तसेच, मराठी साहित्य क्षेत्रात ते संपादक, प्रकाशक, लेखक, समाज सेवक व उत्तम वक्तेही होते. त्यामुळे आमच्या घरी बालपणापासूनचे त्यांचे निकटचे स्नेही वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर (आमच्या आईचे ते मावस भाऊ होते), राज-कवी यशवंत, के. नारायण काळे, प्रभाकर पाध्ये, रा. भी. जोशी, दुर्गा भागवत व इतर साहित्यिकांसह अनेक विद्यार्थ्यांची सतत ये-जा असे. एव्हडंच नव्हे तर, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर व राजकवी यशवंत मुंबईत आले की, त्यांचा मुक्काम कुटुंबासह आमच्या घरी असायाचा. त्यामुळे आमच्या घरी वडिलांचा पुस्तकांचा, पत्रांचा, छाया-चित्रांचा व इतर दाखल्यांचा अफाट परंतु, शिस्तबध्द संग्रह होता. यामुळे शैक्षणिक क्षेत्र असलेल्या आमच्या घराचं दार सर्वांसाठी दिवसभर उघडं असे. त्याचप्रमाणे न्यू यॉर्कलाही आमच्या घरी आमच्या मित्र-मंडळींची व अचानक येणाऱ्या पाहुण्यांची सदैव वर्दळ असे. यामुळे बिचाऱ्या वीणाची त्यांच्यासाठी करावी लागणारी उठबस व कष्टमय मेहनत कांही कमी झाली नाही. त्यातून एअर इंडियाचे येणारे फुकटे प्रवासी व इतरांचे JFK airport वर आगमन झाले की, आमच्याकडे येतांना आम्ही त्यांना गंमतीने ‘Taxi वाल्यांना Kulkarni Exit घ्या’ म्हणून सांगत होतो... असो.

जरीचं नऊवारी पातळ नेसणारी, सदैव हंसरी, दिसायला सुंदर, सदा उत्साही व प्रभावी व्यक्तिमत्वाची आमची आई ही अत्यंत हुशार, विनोदी, गोरीपान, सुग्रण, हौशी, अगत्यशील, परोपकारी व कर्तबगार होती. बऱ्याच वेळां आमचे वडील घरात नसत. त्यामुळे घरी येणाऱ्या साहित्यिक मंडळींचे स्वागतच नव्हे तर, त्यांच्याशी ती उत्तमपणे बौद्धिक व विनोदी संवादही करीत असे. थोडक्यात, वडिलांच्या अनुपस्थितीची जाणीव त्यांना होत नसे. *"आम्हाला कधी साहित्य संमेलनाला जावे लागत नाही. कारण, ती आमच्या घरीच भरत असत ."* असं ती गंमतीने




*एक अतूट मैत्रीचं नातं - वडिलांचे बालमित्र: १) वि. स. खांडेकर व माझे वडील... २) ग. त्र्यं. माडखोलकर व माझे वडील... ३) माझे वडील व राजकवी यशवंत...*

म्हणत असे. सामाजिक कार्याची तिला खूप आवड होती. तसेच, तिला वाचन व लिखाणातही रस होता. आई काव्य करीत असे व चिंध्या लिहित असे. लग्न समारंभात उखाणे घेणे, करणे व सांगणे हा तिचा अत्यंत आवडीचा विषय नव्हे, छंद होता. उखाण्यावरून आठवण झाली. आमच्या लग्नात मला उखाणा घायची कुणी विनंती केली असती तर, माझी पंचाईत होऊ नये म्हणून आई माझ्या शेजारी बसली होती. वीणाने उखाणा घेतल्यावर सर्वांनी मला उखाणा घ्यायची विनंती केली. मी तयारीतच होतो. मीही उखाणा घेतला. तो असा होता: *"संग्रह केले जुन्या दुर्मिळ गाण्यांचे. मात्र, आता माझ्या जीवनात सूर लागले सुमधुर वीणाचे..."* आणि आईसह सर्वजण आश्चर्य चकित झाले होते...

आमच्या आईचा आवाज खणखणीत व उच्चार स्पष्ट असल्याने मुंबईच्या आकाशवाणी केंद्रावरील अनेक गाजलेल्या श्रुतिकांमध्ये तिचा नियमित सहभाग असे. कुठल्याही सहलीला गेल्यावर त्यावरील रसाळ प्रवास वर्णने ती काव्यातून लिहीत असे. त्यातील कांही मुंबईच्या आकाशवाणी वरून तिच्या गोड आवाजात सादरही केली गेली होती. शिवाजी पार्कचा 'वनिता समाज' हा तिला अत्यंत प्रिय होता. सुदैवाने म्हणा माझ्या आई-वडिलांचे ते मौलिक गुण, तो पारंपरिक वारसा व ते संस्कार माझ्याकडे आले. आणि माझ्या अंगवळणी पडले. कुळकर्ण्यांच्या घरात जन्मलेल्या व वेगळ्या वळणावर गेलेल्या या छांदिष्ट अस्मादिक मुलाने तो वारसा सानंद जपला व जोपासला आहे. हे येथे सांगायला मला अभिमानासह आनंद होतोय...

**- उपर गगन विशाल नीचे गहरा पाताल,** बीच में धरती वाह मेरे मालिक तूने किया कमाल... मुंबईहून साता समुद्रापलीकडील अमेरिकेच्या प्रवासाला निघाल्यावर विमानातून खाली बघतांना *'जो न देखे रवि वह देखे कवि'* किंवा *'दृष्टी हवी नवी, तेच सांगतो कवि'* हे विचार व विशाल दृष्टी असलेला महान गीतकार कवी प्रदीपच्या *'उपर गगन विशाल'* या गाण्याची प्रकर्षाने आठवण झाली होती. ज्या जागतिक कीर्तीच्या शहरात काय नाही हा जेथे प्रश्न पडत नाही अशा न्यू यॉर्क शहराबद्दल मला लहानपणापासून प्रचंड आकर्षण होतं. योगायोगाने किंवा सुदैवाने म्हणा, आम्ही आमचं बस्तान न्यू यॉर्क शहरात बसवलं. दुर्दैवाने तीन आठवड्यातच आमच्या वडिलांचं अकस्मात निधन झालं होतं. तत्पूर्वी सुदैवाने त्यांची आम्हा तीनही भावंडांशी भेट झाली होती. ही समाधानाची बाब होती. मात्र, न्यू यॉर्कला आल्यावर एका गिरगांवातून दुसऱ्या गिरगांवात आल्याचे अतीव दुःख वीणाला झाले होते. पण त्याही परिस्थितीला तोंड देऊन कर्तबगार वीणाने आनंदाने संसार थाटला होता. तसेच गुणवान, हुशार व उच्च शिक्षित मुलाने, सलीलने, पुढे शिक्षण आणि व्यवसाय क्षेत्रात उत्तुंग शिखर गांठले. समाधानाची बाब म्हणजे, कॅलिफोर्नियातील लॉस एंजल्स येथे झालेल्या जीवघेण्या निसर्गाच्या आपत्तींपासून वेळीच बाहेर

पडून सलीलने तिथून आतां ईस्ट कोस्टला इंडियानापोलीस येथे स्थलांतर केल्याने मानसिक आधारासह आमची काळजी दूर झाली आहे... वीणाने जरुरीचे यशस्वीपणे शिक्षण घेऊन तिच्या व्यवसायात सिनियर मॅनेजर म्हणून स्थान प्रस्थापित केलं. हे निश्चित कौतुकास्पद होतं. हा मला लाभलेला भक्कम पाठिंबा होता. आणि व्यवसायाच्या दृष्टीने जाहिरात क्षेत्रातील जागतिक Head-quarters असलेल्या न्यू यॉर्क शहरात धडपडत कां होईना, माझंही बस्तान बसायला वेळ लागला नव्हता. थोडक्यात, या महागड्या शहरात आमच्या संसाराचा पाया रोवला गेला होता... आज आम्हाला येथे येऊन ४१ वर्ष झालीत. So, we are proud to be a New Yorker असंच म्हणावं लागेल. आश्चर्य म्हणजे, आजतागायत माझी उत्तम काळजी घेणाऱ्या वीणाने स्वयपांकघर व पोलपाट लाटणं सोडलेलं नाही. आणि हो, आजही मी कप बशीतून भुरक्या मारत चहा पितो. आणि रात्री झोपतांना लताबाईंच्या गाण्यांची सोबत लागते. शिवाय, Cell-Mobile phoneची अजूनही जरुरी न भासल्याने मी तो कधीच विकत घेतला नाही. किंवा तो घेण्याचं



*१) भारतरत्न लता मंगेशकर समवेत मी, त्यांच्या मुबईतील घरी... २) आमच्याघरी आले असतांना सुप्रसिद्ध हास्य अभिनेता मेहमूद समवेत वीणा व मी... ३) सुप्रसिद्ध चरित्र अभिनेत्री लीला चिटणीस यांच्या जीवनाच्या अखेरच्या क्षणी हॉस्पिटलमध्ये घेतलेली अत्यंत भावपूर्ण भेट: ९३ वर्षाच्या लीला चिटणीस, मेहमूद व मी...*

आजपर्यंत मनातही आलं नाही. त्यामुळे WhatsApp-Facebookच्या आरश्यात मला स्वतःचं प्रतिबिंब पाहाण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही. त्यामुळे तक्रारीशीवाय त्याचे असंख्य फायदे आजही मी आनंदाने उपभोगतोय. शिवाय, *There is no next time* या धर्तीवर अचानक घडणाऱ्या चांगल्या-वाईट प्रसंगाचे पुरावे-दाखले आपल्या जवळ असावेत या दृष्टिकोनातून मी माझा 'तिसरा डोळा' - 'छोटा कॅमेरा' नेहमी माझ्या खिश्यात सोबतीला ठेवतो... असो.

**- दूर देश का रहने वाला आया देश पराया...**

आज मागे वळून पाहतांना माझ्या वडिलांची आठवण आली. त्यांनी त्यांच्या आत्मकथनात लिहि-लंय,*"वास्तविक या वयात सांधेदुखी, रक्तदाब, हृदयविकार, निदान डायबेटिस यांसारख्या*

*व्याधींनी माणूस जर्जर होऊन, यांतून केव्हा एकदा सुटतो, असेच त्याला वाटायचे. परंतु या छळणाऱ्या व्याधींपासून मी अजून तरी मुक्त आहे. ही केवळ निसर्गाची कृपा. माझे कर्तृत्व एवढेच की मी निसर्गाला विरोध न करता त्याच्याशी सहकार्य करून माझे आयुष्य निरामय ठेवले. तरी देखील कोणी माझे वय विचारले तर ते सांगायला मला संकोचच वाटतो. कारण विचारणारा तो माझ्या पेक्षा लहान असला तर मी अजून जिवंत कसा याचा त्याला मत्सर नाही तरी आश्चर्यच वाटायचे..!"*


आणि तेही खरंच होतं. परंतु, माझ्या बाबतीत तसं घडलं नाही. मला अनेक दुखणी आलीत. जन्मापासून ते आजतागायत मला अनेक दुखण्यातून जावं लागलं होतं. दैवकृपेने त्यातून मला जीवदानंही मिळाली होती. धाडशी वीणाच्या पाठिंब्याने व सहकार्याने मी त्यातून वेळोवेळी बाहेर येत गेलो. असे कठीण प्रसंग वारंवार आल्याने *"जयंत, या पुढे तरी मला हॉस्पिटलच्या पायऱ्या चढायला लावूं नकोस..."* हे वीणाचे शब्द आजही माझ्या डोळ्यात पाणी आणतात. तिच्या कृपेनेच मी हा साता-समुद्रापलीकडील *'शिवाजी पार्क ते सेंट्रल पार्क'* प्रवास सुखरूपपणे पूर्ण करू शकलो. हे त्रिवार सत्य होय... मात्र, बऱ्याचशा गोष्टीत मला अतिरिक्त प्रयत्न करावे लागले होते.





तुमचं-आमचं, आपलं मंडळ! 'महाराष्ट्र मंडळ, न्यूयॉर्क' *येथील महाराष्ट्र मंडळांसाठी व इतर मराठी संस्थांसाठी चित्रकार या नात्याने माझ्या कुंचल्यातून सादर केलेल्या कलाकृती - सामाजिक कार्याचा थोडक्यात आढावा...*

*खाली: १) दादासाहेब फाळके स्मृती प्रतिष्ठान पुरस्कार... २) मला मिळालेला संगीतकार सी. रामचंद्र पुरस्कार... ३) तत्सम मिळालेलं सन्मानपत्र... ४) आणि दादासाहेब फाळके प्रतिष्ठान*

*तर्फे मुंबई मराठी साहित्य संघात रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. हरून रशीद खान ह्यांच्या हस्ते झालेला माझा जाहीर सत्कार. उजव्या बाजूला उभे शिल्पकार श्री. विनय वाघ व बसलेले दादासाहेब फाळके स्मृती प्रतिष्ठानचे संस्थापक व त्यांचे नातू श्री. चंद्रशेखर पुसाळकर...*











कुठलीही गोष्ट मला सहजा-सहजी मिळाली नाही. आयुष्यात सुख-दुःखाचे डोंगर अनेक आले. मी खचलो नाही. ते यशस्वीपणे पार पाडले. उलट त्यामुळे माझा आत्मविश्वास, जिद्द व महत्वाकांक्षा बळावत गेली होती. आणि या सर्व बिकट परिस्थितून जातांना कुठल्याही कर्तव्याला चुकलो नाही. जातां-जातां मला एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, शेंडेफळ म्हणून *'नकटे व्हावे पण धाकटे होऊ नये'* याचा अनुभव दुर्दैवाने मला आजही येत आहे... असो.


आज नव्या चष्म्यातून द्रुष्टीआडची सृष्टी पाहण्याचं धाडस होत नाहीये. कालांतराने या सुरील्या संगीत प्रवासात माझ्या लेखणीला बहर येऊन 'स्मरणरंजन' या विषयात दुर्मिळ छायाचित्रांसह असंख्य लेखमाला माझ्या हातून गुंफल्या व लिहिल्या गेल्या. रसिक वाचकांनी त्याचे उत्तम स्वागत करून उत्फुर्तपणे प्रतिसाद दिला. जसा फुलाचा सुगंध हा हवेत दरवळला पाहिजे तरच त्या फुलाचं सौंदर्य फुलेल. नाहींतर, कोमेजलेल्या फुलाकडे दुर्लक्ष होईल. ही भावना होती. त्याचबरोबर संवाद, संपर्क, संबंध, संगीत यामुळे व *Sharing is Caring* या ध्येयवादी बोधवाक्याच्या माध्यमातून स्थानिक व विश्वभरच्या मैत्रीच्या नात्यातील जाळ्याचा पीळ घट्ट होत गेला. यामुळे माझी गारुड्याची पोतडी कधीच रिकामी व निकामी झाली नाही. हे सर्व सामाजिक कार्य करीत असतांना भारतात व अमेरिकेत माझे जाहीरपणे अनेक कार्यक्रमांसोबत मान-सन्मान झाले. व्यवसाय, कलात्मक, साहित्य व संग्राहक क्षेत्रात अभिमानाने मानपत्रांसह गौरवपर पारितोषिकें मिळाली. माझे वडील म्हणत पुनर्जन्मावर माझा विश्वास नाही. तेव्हा जे काय करायचे ते *'याचि देही, याचि डोळां' मला केले पाहिजे.'* आणि ते मी आनंदाने केले...



INDIANS FOR LIBERTY

Jayant Kulkarni, a Brooklyn, New York, artist, won the Indians for Liberty logo competition held early this year. Kulkarni's artwork was among several submitted last year by various artists. The runner-








*१-२) १९८६ मध्ये अमेरिकेच्या स्वातंत्र्यदेवतेला जेव्हा शंभर वर्षं पुरी झाली, तेव्हा मला Indians For Libertyच्या सिम्बॉल डिझाईन स्पर्धेत पाहिलं पारितोषिक मिळालं होतं. त्याचा जाहीर वृत्तांत माझ्या फोटो सह American Span Magzine आणि इतर सर्व वर्तमानपत्रातून दिला गेला होता.... ३) त्याचा सिम्बॉल... ४) पारितोषिकासह मला देण्यात आलेलं 'The 1986 Statue of Liberty Centennial Commemorative Coins'...*

हातचं राखून न आमचा अफाट संगीत संग्रह २००८ साली पुण्याच्या रसिकांना दान केला होता. माझ्यावर माझ्या मोठया भावाने, कै. हेमंत याने माझ्यावर *'गाता रहे मेरा दिल'* नांवाचा लेख लिहिला होता. जिवलग स्नेही कै. डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर यांनी माझ्यावर *'जिना इसिका नाम है...'* नांवाचा गौरवपर लेख लिहून येथील मराठी समाजात मानाचं स्थान प्रस्थापित करून दिल होतं. आणि सुधीर गाडगीळ यानी तर मला आश्चर्य-चकित करून माझ्यावर *'फुल टायमर'* नांवाचा लेख लिहिला होता. तसेच, इतर अनेकांनी माझ्यावर योग्यवेळी लेख लिहून माझा अधिक प्रमाणात परिचय करून दिला होता... प्रामाणिकपणे व विश्वासाने सक्रियपणे सामाजिक कार्य करतांना येथील महाराष्ट्र मंडळाने व इतर संस्थांनी वीणाचा व माझा जाहीरपणे गौरव करून आम्हाला सन्मानित केले होते. त्यात, मंडळाचा 'रौप्य महोत्सव' व 'BMMच्या अधिवेशनाचाही' समावेश आहे. आमच्या न्यू यॉर्क मंडळाला जेव्हा पन्नास वर्ष पूर्ण झाली त्यावेळी त्याचं 'घोषवाक्य' वीणाने तयार केलं होतं. आणि त्याचं 'बोध-चिन्ह' माझ्या कुंचल्यातून तयार केलं होतं. त्या जोडीला अत्यंत अवघड व किचकट असा मंडळाचा पन्नास वर्षांचा सचित्र व ऐतिहासिक इतिहास मी लिहून काढला होता. तसेच, नियमाप्रमाणे मंडळाची घटना इंग्रजीत करून घेतली होती. शिवाय, न्यू यॉर्क व न्यू जर्सीच्या संयोगाने दर वर्षी प्रकाशित होणाऱ्या 'रंगदीप' दिवाळी अंकाचा मी संस्थापक असून लेखक व चित्रकार या नात्याने आजतागायत त्या (३३व्या) अंकाशी संबंधित आहे. माझ्या छंदानिमित्ताने व लेखक या नात्याने माझ्या नांवावर दोन लोकप्रिय-Best Seller पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. येथील व परदेशातील मराठी समाजातील सामान्य, असामान्य व नामवंत अशा अनेक व्यक्तींवर मी सचित्र शब्दचित्रें-व्यक्तिचित्रें लिहून प्रकाशित झाली आहेत. माझ्या सिनेसंगीत, छायाचित्रें व इतर छंदामुळे आमच्या आमच्या घरी


सिनेसृष्टीतील सुवर्ण काळातील सर्व क्षेत्रातील अनेक कलाकार मुंबईत आणि येथे अमेरिकेत आमच्या घरी येऊन भेट देऊन गेलेले आहेत. तसेच, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांची दोन वेळां येथे अमेरिकेत व मुंबईत त्यांच्या घरी खाजगिरित्या भेटही झाली आहे... असो.



**- गुज़रा हुआ ज़माना, आता नहीं दुबारा,** हाफ़िज़ खुदा तुम्हारा...
वयाच्या सोळाव्या वर्षापासून मी जो दुर्मिळ गाण्याचा व छायाचित्रांचा संग्रह केला तो भारतीय सिनेसंगीताचा सुवर्ण काळ होता. परंतु, बरेचसे सिनेमे त्यावेळी मी पाहिले नव्हते. आज या उतार-वयात जुन्या चष्म्यातून YouTubeवर ते कृष्णधवल चित्रपट पाहतांना मी दुर्मिळ गाण्यांचा आनंद उपभोगतोय. मुंबईपासून ६० वर्ष जोपासलेला तो आमचा छंद होता. तो आम्ही हातचं न राखून २००८ मध्ये पुण्याच्या रसिकांना सानंद दान केला होता. या स्वरगंगेतून मनमुराद प्रवास करतांना आनंद मिळाला, घेतला, लुटला व आजही सर्वांना देत आहोत. चित्रकार व फोटाग्राफर यामुळे निसर्गाशी दोस्ती झाल्याने विश्वातील महत्वाची स्थळे डोळे भरून पाहिलीत. तसेच, अमेरिकेतील राष्ट्रीय उद्याने व प्रेक्षणीय स्थळं योग्यवेळी पाहिला विसरलो नाही. त्यामुळे जीवनात आता कांही बाकी राहिलंय अशी भावना मनात नाहीये...



*भारतीय चित्रपट सृष्टीला जेव्हा २०१२ साली १०० वर्ष पुरी झाली त्यावेळी पुण्यात झालेल्या महोत्सवाचे उदघाटन, आमच्या दुर्मिळ छायाचित्रांच्या प्रदर्शनाने झाले होते. त्यावेळी पुण्याचे महापौर श्री. आबा बागुल यांच्या हस्ते माझा मानसन्मानासह गौरव करून जाहीरपणे सत्कार केला होता... खाली: १) सिने संगीत व कलाकारांवर लिहिलेलं माझं पहिलं Best Seller पुस्तक, 'सुन जा दिल की दास्तां...' २) स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यासह त्या पुस्तकाला सुप्रसिद्ध अमीन सायनी यांच्याही शुभेच्छा लाभल्या आहेत. पुस्तकासह अमीनभाई... ३) ६० व्यक्तिचित्रें असलेलं ५०० पानांचं माझं दुसरं Best Seller पुस्तक, 'गुलदस्ता'... ४) त्याचे प्रकाशन आमचे कौटुंबिक स्नेही, मित्र, नामवंत साहित्यिक व डॉ. विठ्ठल प्रभु यांच्या हस्ते त्यांच्या घरी झाले होते...*





आज मागे वळून पाहातांना *'शिवाजी पार्क ते सेंट्रल पार्क'* हा  माझा प्रदीर्घ प्रवास यशस्वी झाला. ते अंतर शून्यावर आणलं. थोडक्यात, आठवणींची ही स्मरणमाला बव्हंशी आनंदयात्राच ठरली यात वाद नाही. आणि या आनंदात परिस्थितीशी तडजोड करून पुढील आयुष्य कंठायचंय याची जाणीव होत आहे. वयोमानाने हालचाली मंदावल्यामुळे आतां शरीर आवाजच काय परंतु, गाय-लाही लागलं आहे. धग-धग आवाजात शिटी वाजवीत आयुष्याची ती ‘तूफान मेल’ जणूं कांही वृद्धत्वाची जाणीव करून *'ये ज़िंदगी के मेले, दुनिया में कम न होंगे'* असं सुचवीत शेवटचं स्टेशन गांठायला येत आहे. याचीही जाणीव होतेय. त्या धुरातून भावनांसह निघणाऱ्या स्मृती पटलावर अनेक आठवणींना उजाळा मिळतोय. अनेक प्रवासी त्यात चढले, वाटेत उतरले व त्यातील जे मित्र बनले त्यांची कायमची सोबत जडली. ही माझ्या सुखी जीवनाची गुरु किल्ली होय...

४० वर्षांपूर्वी शिवाजी पार्कहून अमेरिकेला निघतांना डोळे पाणावले होते. आज या सेंट्रल पार्कच्या मोकळ्या बांकड्यावर बसल्यावर गत स्मृतींच्या आठवणींसह मनात असंख्य विचार आले. अगदी चित्रपटाच्या Flash Back सारखे. तेच येथे शब्दरूप केले. जयंत तुझं *'शिवाजी पार्क ते सेंट्रल पार्क'* - ' आत्मकथन लिहून पूर्ण झालं की मला सांग. पुस्तकरूपाने मी ते प्रकाशित करेन. दुर्दैवाने अशी आश्वासनं दिलेल्या व्यक्ती आज हयात नाहीत. संकल्प व सिद्धी यामध्ये नियती प्रमाणे प्रकाशकांचीही सीमारेषा असते. परंतु, आशावाद प्रबळ असल्यामुळे हे काल्पनिक मनोरे उभारण्यातच आता आयुष्य व्यतीत करावयाचे...






*१) माझं जन्मस्थान: शिवाजी पार्कच्या डॉ. राऊत रस्त्यावरील वैभवी मधल्या गल्लीतील 'शाहाडे सदन'. जे आतां जमीनदोस्त होऊन तेथे नव्याने २२ मजली उंच टॉवर होणार आहे... २) दादरचं भूषण, थोर समाज-सेवक, आमचे कौटुंबिक स्नेही व शिवाजी पार्कचे आदरणीय नागरिक कै. प्रकाशभाई मोहाडीकर यांच्या हस्ते, शाहाडे सदन येथे आमच्या वडिलांच्या नांवे निल फलकाचे/Blue Plaqueचे उदघाट्न करतांना. सोबत मी... ३) मुंबईत गेलो की, २४/७ आमच्या तैनातीला असणारे माझे प्रेमळ, कर्तव्य-दक्ष व जिवाभावाचे जिवलग बालमित्र: नविन आंबुलकर व सुधीर हडकर यांच्या समवेत मी... ४) कौतुकासह माझ्या लेखणीला विशेष बहर आणणाऱ्या, प्रेरणेसह प्रोत्साहन देणाऱ्या, सरस्वतीची लेखणी लाभलेल्या सिद्धहस्त लेखिका व आमच्या स्नेही कै. डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर समवेत मी. त्याचप्रमाणे, वेळोवेळी त्यांनी केलेलं मार्ग-दर्शन मी कधी विसरूं शकणार नाही...*













*My own photographic humble tribute to World Trade Center - 9/11 Tragedy... खाली: माझ्या स्मरणरणात्मक दुर्मिळ गाणी ऐकविण्याच्या Audio-Visual कार्यक्रमांची आकर्षक व माहितीपूर्ण माहिती पत्रकं. १) श्रेष्ठ गायक कलाकार... व कार्यक्रमाची Brochures २-३) सुन जा दिल की दास्तां... ४) यादें... ५) गीतांजली...*








चाळीस वर्षांपूर्वीपासून असलेल्या मैत्रीच्या ऋणानुबंधातील आमचे न्यू यॉर्क मधील स्नेही, निवृत्ती नंतर आज अमेरिकेत निरनिराळ्या ठिकाणी स्थलांतरीत झाले आहेत. म्हणून आमचा मित्रसंग्रह कांही कमी झाला नाही, मैत्रीचा पीळ सैल झाला नाही व त्यांच्याशी संपर्कही तुटला नाही. तसेच, कर्तव्याला कधी चुकलो नाही. मात्र, आम्ही आनंदाने एकाच ठिकाणी एकाच जागी पाय रोऊन

आहोत. आणि हो, *Sharing is Caring* या माध्यमाच्या जोडीला संवाद, संपर्क, संबंध व संगीताची भक्कम साथ आजही कायम आहे. ही 'मम सुखाची ठेव' आहे...




*१) आमचं लग्न: ११, मार्च, १९७३... २) आमच्या लग्नाचा रौप्य महोत्सव: ११, मार्च १९९८... ३) आमच्या लग्नाचा सुवर्ण महोत्सव: ११, मार्च २०२३... ४) वीणा, मुलगा सलिल व मी...*

दरम्यान माझ्या वाचनात आलं होतं की, *"घरातल्या वडिलधाऱ्या ज्येष्ठ व्यक्ती म्हणजे वटवृक्षच. मायेचं पांघरुण, प्रेमाची शीतल छाया देणारा, संस्काराच्या पारंब्यांनी आधार देणारा, सुख-दु:खात तटस्थपणे आधारस्तंभ बनणारा हा वटवृक्ष म्हातारपणाच्या ओझ्याने अस्थिर बनू पाहतो. एकेकाळी संपूर्ण घरचा आधारस्तंभ मानला जाणारा हा वटवृक्ष बऱ्याच जणांना अडगळ वाटतो. नकोसा होऊ लागतो. मग पुढची पायरी वृद्धाश्रमाची. मात्र वृद्धाश्रम हा शिक्षाच असतो असं नाही तर तिथलंही जीवन सुंदर असू शकतं."* याचा आनंदाने अनुभव घेणारे आमच्या परिचित आहेत. सुप्रसिद्ध विचारवंत कवी 'खलील जिब्रान' यांची *'नदी मागे फिरून जात नाही'* किंवा *'The River Cannot Go Back'* ही एक गाजलेली कविता आहे. त्याते तो म्हणतो, *"आयुष्यात (अखेरचा) प्रवास कुणालाच चुकत नाही. तसंच नदीचं असतं. जसं 'मन सागरात लाटा, त्याच्या अगणित वाटा. किनाऱ्यास धडक ठरलेली, देहाच्या झिजती टाचा.' पवित्र गंगा नदीचंही तेच आहे. समुद्रात मिळतांना ती मागे फिरून जात नाही. परंतु, त्या सुख-दुःखाच्या प्रवासात ती लाखोंना पवित्र करून जाते."* आणि आत्मकथन लिहिण्यापूर्वी हा सिद्धांत माझ्या मनात होता. थोडक्यात, समर्पित जीवन - dedicated life अनुभवतांना गोळा केलेल्या या सुखदुःखाच्या अनुभवांचे गाठोडे बांधताना व आज वाचकांसमोर ठेवतांना मला आनंद होतोय... आता सर्व हालचाली मंदावल्या आहेत. दूरदृष्टीचा विचार करून जीवनाच्या या संध्याछायात आमच्या जवळच असलेल्या India Home senior care center मध्ये आठवड्यातून एकदा आम्ही भेट देतो. त्यामुळे समवयस्क मंडळी भेटतात. योगासनांसह जरुरीचा शारीरिक व्यायाम घेतला जातो. वैद्यकीय, Healthcare व तत्सम उपयुक्त इतर माहिती मिळते व दिली जाते. थोड-क्यात, मनोरंजनासह योग्य प्रमाणात वैयक्तिकपणे उत्तम काळजी घेतली जाते. यामुळे

मानसिक समाधान व आनंद मिळतो... जाता-जाता एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, या उत्तर वयातही व्यवसायातील व इतर उपयुक्त माहितीसाठी वीणाचा सल्ला घ्यायला अनेकांचे आजही फोन येतात. आणि दुर्मिळ गाण्यांच्या संदर्भात, लेखांसाठी व कार्यक्रमासंबंधित मलाही विचारणा केली जाते. जमेल त्याप्रमाणे त्यांच्या इच्छा पूर्ण करतो. शेवटी, तडजोड हे आयुष्याचं दुसरं नांव आहे असं म्हणतात. तेही खरं आहे यात शंका नाही... असो.

शिवाजी पार्कहून निघतांना माझ्या संग्राहक मित्राने, अनिल/अन्या शिंदेंने मला त्याच्या वडिलांचे Busines Card दिले होते. ते देतांना तो म्हणाला होता, *"जयंत, न्यू यॉर्कला गेलास तर माझ्या वडिलांना भेट."* अन्याचे वडील हे दुसरे तिसरे नसून जागतिक कीर्तीचे ज्वेलरी डिझायनर अंबाजी शिंदे होते. ते Manhattan मध्ये असलेल्या विश्वविख्यात Harry Winston या ज्वेलरी शॉप मध्ये चीफ ज्वेलरी डिझायनर म्हणून १९५६ पासून काम करीत होते. त्यांना जेव्हा मी प्रथम तेथे भेटलो तेव्हा, वडील या नात्याने शिंदेसाहेबानी मला जो प्रेमाने सल्ला दिला तो असा होता: *"जयंत, तुझ्या विषयी अनिलने याआधी पूर्ण कल्पना दिली होती. तू समाजकार्य जरूर कर. परंतु, पैशाच्या मागे लागू नकोस. पैसे कांही वर घेऊन जातां येत नाहीत. तू नांव कमाव. बस, नांव कमाव. तेच तुझ्या मागे राहील..."* त्यांचा हा सल्ला व आशीर्वाद मोलाचा होता. तो आम्ही कधीच विसरलो नाही. म्हणतात काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या (सहा शत्रू) षडरिपूंच्या भावनांमुळे मन अशांत होते. तेही खरं आहे. मात्र, त्यापासून आम्ही दूर राहिलो. आणि आम्ही आमचं अंथरूण पाहूनच पाय पसरले...

आपला,

**जयंत विठ्ठल कुळकर्णी.**
क्वीन्स, न्यू यॉर्क, अमेरिका.
Jvkny1@gmail.com

ता. क: कृपया खाली दिलेल्या लिंकवर माझ्याविषयीची व लेखाची कांही विशेष माहिती पाहावी व वाचावी:

१) लेखक तुमच्या भेटीला - जयंत कुळकर्णी - YouTube

२) आम्ही बालमोहनकर । बालमोहनचे कीर्तिवंत । जयंत वि. कुळकर्णी । Episode 3 । Jayant Kulkarni - YouTube

३) माझा लेख: संगीतकार सी. रामचंद्र यांच्या 'सरगमी जीवनाची' जन्म शताब्दी.
http://www.marathicultureandfestivals.com/jayant-kulkarni